आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचं सरकार राज्यात सत्तेत येईल, असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास
- महाविकास आघाडीचं जागावाटप दसऱ्याला जाहीर होणार
- पूरग्रस्त १४ राज्यांना केंद्र सरकारकडून निधी जारी, महाराष्ट्राला सर्वाधिक १ हजार ४९२ कोटी रुपये मिळणार
- जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात ६५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान

**आणि**

- बांगलादेशविरुद्धची कसोटी क्रिकेट मालिका भारतानं जिंकली

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचं सरकार राज्यात सत्तेत येईल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज व्यक्त केला. मुंबईत भाजपा कार्यकर्त्यांना त्यांनी संबोधित केलं. कुठल्याही सर्व्हेचा विचार करू नका, महायुती पुन्हा सत्तेत येईल ही काळ्या दगडावरची रेष असल्याचं त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना सांगितलं.

प्रदेश भाजपा निवडणुकीसाठी जी योजना बनवेल ती योग्यरितीनं कार्यान्वित करण्याचं आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केलं. मतदानाचं प्रमाण १० टक्क्यांनी वाढवण्याचं आवाहनही त्यांनी केलं. संध्याकाळी त्यांनी नवीमुंबईत वाशीमध्ये कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत मार्गदर्शन केलं. या वेळी त्यांनी कोकण आणि ठाण्यातल्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

<><><><><>

महाविकास आघाडीचं जागावाटप दसऱ्याला जाहीर होणार आहे. आतापर्यंत २०० पेक्षा अधिक जागांवर एकमत झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली. आता डावे पक्ष आणि इतर संघटनांसोबत चर्चा सुरू असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

काँग्रेस जाती-पातीचं राजकारण करत असल्याची टीका भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. ते आज हरयाणात पलवल इथं निवडणूक प्रचारसभेत बोलत होते. काँग्रेसनं ७० वर्ष सत्तेत असूनही जनतेला रस्ते, वीज, पाणी, शौचालयं, घरं अशा मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवलं, जम्मू-कश्मीरमधे देशाची राज्यघटना राबवण्यात अडथळे निर्माण केले, ३७० कलम रद्द करायला आणि महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीला विरोध केला, अशी टीकाही त्यांनी केली. भाजपानं देशापुढचे प्रश्न पूर्णपणे गांभीर्यानं सोडवले, असं मोदी म्हणाले.

हरयाणामधे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज बहादुरगढ ते कल्लूपार चौकी, आणि सोनपतमधलं हुडा मैदान ते गोहानातलं किलोहड्डी अशी संकल्प यात्रा काढली. भाजपा सरकार बड्या भांडवलदारांना मदत करत असल्याची टीका त्यांनी सोनपत इथल्या प्रचारसभेत केली. बेरोजगारी आणि अग्निवीर योजनेचा मुद्दाही त्यांनी या सभेत उपस्थित केला.

<><><><><>

डिजिटल पायाभूत सुविधा, सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि क्रीडा क्षेत्रात भारत आणि जमैका यांच्या आज ४ सामंजस्य करार झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जमैकाचे

प्रधानमंत्री डॉ. अंड्र्यू होलनेस यांच्यात झालेल्या चर्चेनंतर या करारांवर स्वाक्षरी झाली. जमैकाचे प्रधानमंत्री पहिल्यांदा भारत दौऱ्यावर आले आहेत. विविध क्षेत्रांमधले भारताचे अनुभव जमैकाला द्यायला तयार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. जमैकन सैन्यालाही भारत प्रशिक्षण देणार आहे. गुन्हेगारी, अंमली पदार्थांची वाहतूक, दहशतवाद ही दोन्ही देशांसमोरची आव्हानं आहेत आणि त्यावर एकत्रितरित्या प्रयत्न करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली.

**<><><><><>**

एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण या क्षेत्रातल्या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा निर्माता बनण्याचं देशाचं ध्येय असायला हवं असं नीती आयोगाचे सदस्य व्ही. के. पॉल आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमाला संबोधित करताना म्हणाले. एआयचा सर्वाधिक चांगला वापर कृषी आणि आरोग्य क्षेत्रात होऊ शकतो का, यावर संशोधन होऊ शकतं असंही त्यांनी यावेळी म्हटलं. नव उद्योजकांसाठी व्यासपीठ असलेल्या मेडटेक मित्र या उपक्रमाविषयीही पॉल यांनी माहिती दिली. या उपक्रमाद्वारे स्टार्टअप्सना उद्योगातलं वितरण तसंच बाजारातल्या स्थितीविषयी मार्गदर्शन मिळू शकतं, असं पॉल यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात अठ्ठेचाळीस रूपये पन्नास पैसे इतकी वाढ केली आहे. या सिलिंडरची किंमत आता एक हजार सहाशे ब्याण्णव रुपये पन्नास पैसे इतकी झाली आहे. तर पाच किलो एलपीजी सिलिंडरच्या दरातही १२ रुपयांनी वाढ केली आहे. आजपासून हे दर लागू झाले आहेत. दरम्यान, घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**<><><><><>**

पूरग्रस्त १४ राज्यांना ५ हजार ८५८ कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारनं आज जारी केला. त्यापैकी सर्वाधिक हिस्सा म्हणून महाराष्ट्राला १ हजार ४९२ कोटी रुपये मिळणार आहे. राज्य आपत्ती निवारण प्रतिसाद निधीतला केंद्र सरकारचा वाटा आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण प्रतिसाद निधीतला आगाऊ हप्ता म्हणून हा निधी दिला जातोय. यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनामुळं या राज्यांमध्ये नुकसान झालं होतं. यावर्षी आतापर्यंत २१ राज्यांना एकूण १४ हजार ९५८ कोटी रुपयांचा निधी वितरीत झाला आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या मतदानाला आज संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ६५ पूर्णांक ४८ शतांश टक्के मतदान झालं. तिसऱ्या टप्प्यात ४० विधानसभा मतदारसंघ असून त्यापैकी २४ जम्मू विभागात तर १६ काश्मीरमध्ये आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, या टप्प्यात सर्वाधिक ७२ पूर्णांक ९१ शतांश टक्के मतदान उधमपूरमध्ये झालं आहे.

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी १८ सप्टेंबरला पहिल्या तर  २५ सप्टेंबरला दुसऱ्या टप्प्यात मतदान झालं. पहिल्या टप्प्यात ६१ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात ५७ टक्के मतदानाची नोंद झाली. या सर्व टप्प्यांची मतमोजणी ८ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ठाणे जिल्ह्यातल्या कळवामध्ये ४० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली. सहकार विद्या प्रसारक मंडळाच्या सह्याद्री शाळेत पाचव्या आणि सहाव्या

इयत्तेत ही मुलं शिकत होती. त्यांच्यावर ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या दोन आरोपींना पोलिसांनी अद्याप पकडलं नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणी स्वतःहून दखल घेऊन चालवलेल्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती रेवती मोहिते- डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी पोलिसांच्या निष्क्रीयतेवर ताशेरे ओढले. या प्रकरणातले दोन आरोपी संबंधित शाळेचे विश्वस्त असून ते अद्याप फरार आहेत.

या आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर होण्याची वाट पहात आहात का असा सवाल खंडपीठानं पोलिसांना केला. विशेष तपास पथकाचे प्रमुख सुनावणीला हजर नसल्याबद्दलही न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. पुढची सुनावणी येत्या २३ ऑक्टोबरला ठेवली आहे.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. चंद्रपूर जिल्ह्यात हे अभियान राबवण्यात आलं. याबाबत स्वच्छता मित्र बबलु गेडाम यांनी आकाशवाणीला सांगितलं....

**होल्ड बाईट - बबलु गेडाम (२१ सेकंद)**

**<><><><><>**

बांगलादेशाविरुद्धच्या मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना आज भारतानं जिंकला. दुसऱ्या डावात बांग्लादेशाकडून मिळालेलं ९५ धावांचं आव्हान भारतानं ३

गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. भारतानं ही मालिका २-० अशी जिंकली. यशस्वी जयस्वाल सामनावीर तर आर. अश्विन मालिकावीर ठरला.

पाचव्या दिवशी बांगलादेशाचा दुसरा डाव १४६ धावांवर आटोपला. जसप्रित बुमराह, आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. यशस्वी जयस्वालच्या ५१ आणि विराट कोहलीच्या नाबाद २९ धावांच्या बळावर भारतानं हा सामना जिंकला.

<><><><><>

थायलंडमध्ये बँकॉकमध्ये शाळेच्या बसला लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला. त्यात २३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.सहलीला निघालेल्या या बसमध्ये एकूण ३८ विद्यार्थी आणि ६ शिक्षक होते. टायर फुटल्यानंत बस दुभाजकावर धडकली आणि इंधनाच्या टाकीनं पेट घेतला.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या आर जी कर रुग्णालयातल्या डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी सीबीआयचा तपास संथ गतीने होत असल्याचा आरोप करत W B J D F या डॉक्टरांच्या संघटनेने पुन्हा एकदा कामबंद आंदोलन सुरू केलं आहे. राज्यातल्या रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरवण्याची मागणीही डॉक्टरांनी केली आहे.

<><><><><>

चीनसोबत एलएसी अर्थात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरली परिस्थिती स्थिर असली तरी सामान्य झालेली नाही असं लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत चाणक्य डिफेन्स डायलॉग या कार्यक्रमात ते आज बोलत होते. एप्रिल २०२० पूर्वी होती तशी स्थिती पूर्ववत करणं हे भारताचं उद्दिष्ट असल्याचं द्विवेदी

यांनी सांगितलं. ही परिस्थिती जोपर्यंत पूर्ववत होत नाही तोपर्यंत भारत कोणत्याही स्थितीला तोंड द्यायला तयार आहे, असंही लष्करप्रमुख द्विवेदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केरळमधे गैरमार्गाने मिळालेला पैसा देशविरोधी कारवाईसाठी वापरणाऱ्या सोने तस्करांविरुद्ध काय कारवाई केली, याबाबत केरळचे राज्यपाल अरीफ मोहम्मद खान यांनी राज्यसरकारकडून अहवाल मागवला आहे. मलप्पूरम जिल्ह्यात जप्त केलेलं सोनं आणि हवाला मार्गे पाठवला जाणारा पैसा यांचा अतिरेक्यांशी संबंध असल्याच्या मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या वक्तव्याचा संदर्भ राज्यपालांनी दिला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत वाडीबंदर कोचिंग डेपोची पाहणी केली. पायाभूत सुविधा, तांत्रिक प्रगती आणि डेपोच्या भविष्यातल्या विस्तार योजनांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.